ePaper

| वर्ष - 7 | अंक - 355 | UDYAM-MH-26-0158827 |

# महाईन्यूज (TM)

लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

www.mahaenews.com | बुधवार, दिनांक 26 जून 2024 | पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | maha_enews | Mahaenews

## ओबीसी, मराठा नेत्यांनी संयमाने बोलावे : शंभूराज देसाई



### आतील पानांत


- रशीद खानच्या शिलेदारांचं कौतुक!
- अफगाणिस्तानचा संघ सेमीफायनलमध्ये
- लोकसभा अध्यक्षपदासाठी निवडणूक
- बेट्या तुझा टांगा पलटवतोच!


## इंद्रायणी नदी प्रदूषणाचा मुद्दा

# आ. लांडगे विरुद्ध उबाळे ‘ठिणगी’!

## निवडणुकीची सलामी : ‘कॉमन ऍक्शन प्लॅन’ म्हणजे वरतीमागून घोडे!

। भोसरी। महाईन्यूज

**पिंपरी चिंचवड शहरातील इंद्रायणी आणि पवना नदीच्या प्रदूषण मुक्तीसाठी भोसरी विधानसभेचे आमदार महेश लांडगे यांनी ‘कॉमन ॲक्शन प्लॅन’ची गरज असल्याचे सांगत पावसाळी अधिवेशनात सरकारचे याकडे लक्ष वेधणार असल्याचे म्हटले आहे. आमदारांचे हे वक्तव्य म्हणजे वरातीमागून घोडे असल्याची टीका शिवसेना नेत्या पुणे जिल्हा संघटिका सुलभा उबाळे यांनी केली आहे.**





सुलभा उबाळे यांनी म्हटले आहे की, पालखी सोहळा अवघ्या तीन दिवसांवर येऊन ठेपला असताना इंद्रायणी नदी मोठ्या प्रमाणात प्रदूषित झाल्याचे चित्र आहे. पिंपरी चिंचवड महानगरपालिका कार्यक्षेत्रातील पवना व इंद्रायणी नदी ह्याठिकाणी नद्यांचे प्रदूषण झालेले असून नदीमध्ये जलपर्णी मोठ्या प्रमाणात वाढलेल्या आहेत. तसेच काही कंपनींकडून थेट नदीमध्ये रसायनमिश्रित पाणी सोडण्यात आलेले असून सदर प्रकारामुळे नदीचे प्रदूषण वाढत आहे. जेणेकरून नद्यांचे अस्तित्व धोक्यात आले आहे. त्यामुळे पाण्यामधील जलचर जीवांना धोका निर्माण झाला आहे. महापालिकेमार्फत नदी स्वच्छता मोहीम हाती घेण्यात आली नसून काहीही न करता पावसामुळे जलपर्णी वाहून जाईल असे समजून दुर्लक्ष करण्यात आले. सदर कामासाठी कोट्यवधी रुपयांचे बिले निघत असतात परंतु ठेकेदारांकडून ती कामे वेळेत पूर्ण होत नाही. ह्यामधून पालिकेचा बेजबाबदारपणा समोर येत असून सदर बाब अत्यंत गंभीर आहे.

गल्ली ते दिल्ली भाजपची सत्ता असून देखील नदी सुधार प्रकल्पाची अंमलबजावणी का होऊ शकली नाही.

नदी परिसरात राडारोडा टाकणे हे बंद झाले नाही. MIDC चे एसटीपी प्लांट देखील चालू करू शकले नाहीत. एवढेच नाहीतर मोशी कचरा डेपो इथून सुद्धा घाणेरडे काळे पाणी इंद्रायणी नदी पात्रामध्ये जाते, ह्यावर आतापर्यंत काय उपाययोजना करण्यात आलेली नाही.

### इंद्रायणी नदी प्रदूषणमुक्त करण्यासाठी आमदारांनी काय केले

मुख्यमंत्री असताना देवेंद्र फडणवीस हे इंद्रायणी नदीला भेट देण्यासाठी आले होते तेव्हा ह्यांनीदेखील इंद्रायणी नदी प्रदूषणमुक्त करण्याचे आश्वासन देण्यात आलेले होते, ह्याला आता बरीच वर्षे झाली. तसेच आताचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे ह्यांनी देखील इंद्रायणी नदी प्रदूषणमुक्त करण्याचे आश्वासन दिले होते. स्वतःचे ब्रॅण्डिंग दुसऱ्याच्या पैशांमधून करण्याशिवाय इंद्रायणी नदी प्रदूषणमुक्त करण्यासाठी आमदारांनी काय केले ते सांगावे? असा सवाल सुरुवात यांनी उपस्थित केला आहे.

## ‘इंद्रायणी नदीचे पाणी दोन दिवसात स्वच्छ करा!

## तुषार कामठे : पालखी प्रस्थानाच्या निमित्ताने वारकऱ्यांच्या सुरक्षेची काळजी घेण्याची मागणी

। पिंपरी । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**शुक्रवार दि. 28 जून रोजी जगद्गुरू संत तुकाराम महाराज व शनिवार दि. 29 जून रोजी संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर महाराज यांच्या पालखीचे प्रस्थान अनुक्रमे देहू व आळंदी येथून होणार आहे, त्यासाठी लाखो वारकरी भाविक भक्त पिंपरी चिंचवड शहरात दाखल होत आहेत. याच पार्श्वभूमीवर इंद्रायणी नदीचे पाणी अत्यंत दूषित असून त्यात स्नान केल्यास वारकरी बांधवांच्या आरोग्याला धोका निर्माण होऊ शकतो यासाठी राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष शरदचंद्र पवार पक्षाचे शहराध्यक्ष तुषार कामठे यांनी येत्या दोन दिवसात इंद्रायणी नदीचे पाणी वापरण्यायोग्य करा अन्यथा तीव्र जनआंदोलन उभारणार असल्याचा इशारा दिला आहे.**



राज्याचे मुखमंत्री तथा पर्यावरण मंत्री एकनाथ शिंदे, पिंपरी चिंचवडचे प्रभारी आयुक्त राहुल महिवाल व पुण्याचे जिल्हाधिकारी सुहास दिवसे यांच्याकडे पत्राद्वारे कामठे यांनी मागणी केली आहे. सदर पत्रामध्ये म्हंटले आहे की, पालखी प्रस्थान सोहळ्याच्या निमित्ताने महाराष्ट्रभरातील समस्त वारकरी संप्रदाय पवित्र इंद्रायणी नदी पात्रात स्नान करण्यासाठी तसेच पाणी प्राशन करण्यासाठी आतुर असतो, आपल्या धार्मिक आस्थेनुसार नद्यांना अत्यंत पवित्र व जीवनदायिनी समजले जाते, पण दुर्दैवाने कित्येक वर्षांपासून इंद्रायणी नदीमध्ये पिंपरी चिंचवड शहर परिसरातील सांडपाणी, विषारी रसायने थेट सोडले जात असल्याने इंद्रायणी नदीचे पाणी आरोग्याच्या दृष्टीने अत्यंत घातक बनले असून स्नान करण्यासाठी सुद्धा हे पाणी वापरले जाऊ शकत नाही, या पाण्यात स्नान केल्यास किंवा हे पाणी प्राशन केल्यास वारकरी बांधवांच्या आरोग्यावर घातक परिणाम होऊ शकतो, अशी परिस्थिती आहे.

### अन्यथा तीव्र जनआंदोलन

म्हणूनच पिंपरी चिंचवड महानगरपालिका प्रशासन, पुणे जिल्हा प्रशासन, व राज्य शासन पर्यावरण विभाग यांना आम्ही सदर पत्राद्वारे विनंती करतो की आपली सर्व यंत्रणा कामाला लावून येत्या दोन दिवसांमध्ये म्हणजेच 27 जून 2024 पर्यंत इंद्रायणी नदीचे पाणी आरोग्याच्या दृष्टीने सुरक्षित व पिण्यायोग्य करावे, नदीत सोडले जाणारे सांडपाणी, विषारी रसायने, कचरा आदी समस्यांवर तसेच संबंधितांवर तात्काळ कारवाई करावी. वारकरी बांधवांच्या आरोग्याला कुठल्याही प्रकारचा धोका होणार नाही याची व्यवस्था सुनियोजित करावी.

# पालखी सोहळ्यासाठी वाहतुकीत बदल

## पर्यायी मार्गाचा वापर करण्याचे पोलिसांचे आवाहन

।पुणे ।महाईन्यूज । प्रतिनिधी।

**संत तुकाराम महाराज आणि संत ज्ञानेश्वर महाराज पालखी सोहळा शुक्रवारपासून ( २८ जून) सुरू होत आहे. शुक्रवारी संत तुकाराम महाराजांची पालखी देहूतून तर श्री संत ज्ञानेश्वर महाराज यांची पालखी शनिवारी ( २९ जून) आळंदीतून आषाढी वारीसाठी प्रस्थान ठेवणार आहे. या पार्श्वभूमीवर शहरासह देहू-आळंदी मार्गावर वाहतुकीत बदल करण्यात आला आहे.**



हा बदल २५ ते ३० जूनपर्यंत असणार आहे. प्रस्थान सोहळ्यासाठी येणाऱ्या भाविकांच्या वाहनांसाठी देहू, आळंदी येथे वाहनतळाची व्यवस्था करण्यात आली आहे. तुकोबारायांच्या पालखीचा पहिला मुक्काम देहूतील इनामदार वाडा येथे असून, शनिवारी ( २९ जून ) हा सोहळा आकुर्डीतील विठ्ठल मंदिर येथे मुक्कामासाठी येणार आहे. तसेच माऊलींच्या पालखीचा पहिला मुक्काम आळंदीतीलच गांधी वाडा येथे असेल. त्यानंतर या दोन्ही पालख्या शनिवारी ( ३० जून) पुण्याच्या दिशेने मार्गस्थ होणार आहेत.चिंबळी ते आळंदी रस्ता बंद राहणार असून, चिंबळी फाटा चौक, चाकण येथून आळंदीकडे येणारी वाहने जय गणेश साम्राज्य चौक, अलंकापुरम चौक मार्गे तसेच भोसरी चौक- मॅगझीन चौक मार्गे जातील. चाकण ते आळंदी या मार्गावरील वाहने जय गणेश साम्राज्य चौक, अलंकापुरम चौक मार्गे, भोसरी चौक-मॅगझीन चौक मार्गे जातील. वडगाव घेणंद ते आळंदी या मार्गावरील वाहने चाकण-वडगांव घेणंद शेळपिंपळगाव मार्गे कोयाळी कमान, कोयाळी-मरकळगाव मार्गे जातील. मरकळ ते आळंदी या मार्गावरील वाहने मरकळकडून धानोरे फाटा मार्गे चऱ्होली फाटा – मॅगझीन चौक, अलंकापुरम चौक मार्गे जातील. भारतमाता चौक ते आळंदी या मार्गावरील वाहने जय गणेश साम्राज्य चौक, अलंकापुरम चौक मार्गे, भोसरी चौक- मॅगझीन चौक, मोशी-चाकण-शिक्रापूर मार्गे जातील. मोशी-आळंदी या मार्गावरील वाहने जय गणेश साम्राज्य चौक, अलंकापुरम चौक मार्गे, भोसरी चौक-मॅगझीन चौक, मोशी-चाकण-शिक्रापूर मार्गे जातील. विश्रांतवाडी ते आळंदी या मार्गावरील वाहने पुणे-दिघी मॅगझीन चौकाकडून आळंदीकडे येणारी वाहने भोसरी-मोशी-चाकणमार्गे शेलपिंपळगाव मार्गे जातील. अलंकापुरम-जय गणेश साम्राज्य चौक मार्गे जातील. आळंदीकडे येणाऱ्या सर्व प्रकारच्या वाहनांना चऱ्होली फाटा चौकाचे पुढे, डुडुळगाव जकात नाक्याचे पुढे, केळगाव चौक, बापदेव चौकाच्या पुढे, इंद्रायणी रुग्णालयाच्या पुढे, विश्रांतवाडीच्या, धानोरी फाटा / पीसीएस चौकाचे पुढे जाण्यास प्रवेश बंदी असेल. हा बदल मंगळवारी २५ ते ३० जून रात्री नऊ वाजेपर्यंत अथवा वाहतूक सुरळीत होईपर्यंत लागू राहणार आहे.मुंबई-पुणे महामार्गावरील देहू कमान ते देहूगाव या मार्गावरील वाहतूक बंद राहणार असून, या मार्गावरील वाहने भक्ती-शक्ती चौक ते त्रिवेणीनगर ते तळवडे गावठाण ते कॅनबे चौक ते खंडेलवाल चौक देहूगाव या मार्गे जातील. चाकण ते कॅनबे चौक तसेच तळवडे गावठाण चौक ते कॅनबे चौक ते महिंद्रा सर्कल हा मार्ग बंद राहणार आहे. या मार्गावरील वाहने मोशीतील भारतमाता चौक, नाशिक हायवे मार्गे इच्छितस्थळी जातील. तळेगाव-चाकण रस्त्यावरील देहूफाटा ते देहूगाव हा मार्ग बंद राहणार असून, या मार्गावरील वाहने एचपी चौकमार्गे जातील. देहू कमान ते चौदा टाळकरी कमान ते भैरवनाथ चौक हा मार्ग सर्व प्रकारच्या वाहनांसाठी बंद राहणार आहे.

### आळंदीत वाहनतळांची व्यवस्था

आळंदी- देहू रस्त्यावरील तळेकर पाटील चौक (दक्षिणेस) तीन एकर, उत्तरेस एक एकर, ज्ञानविलास महाविद्यालय डुडुळगाव जकात नाक्याजवळ दहा गुंठे, बोपदेव चौक ४.५ एकर, इंद्रायणी रुग्णालयासमोर (चाकण रोड) नऊ एकर, विश्रांतवाडी वडगाव रस्ता २५ एकर आणि मुक्ताई मंगल कार्यालयासमोर एक एकर जागेत वाहतळाची व्यवस्था करण्यात आली आहे.

# अजित गव्हाणे यांनी फुंकले विधानसभेचे रणशिंग

## सर्वच राजकीय पक्षाच्या इच्छुकांनी मोर्चेबांधणीला सुरुवात

।पुणे ।महाईन्यूज । प्रतिनिधी।

**आगामी विधानसभा निवडणुकीच्या जागावाटपाबाबत महाविकास आघाडी अथवा महायुतीचा जागावाटपचा फॉर्मुला अद्याप निश्चित झालेला नाही. तरीही सर्वच राजकीय पक्षाच्या इच्छुकांनी मोर्चेबांधणीला सुरुवात केली आहे.**



उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या राष्ट्रवादी कॉंग्रेसचे शहराध्यक्ष अजित गव्हाणे यांनी यावेळी भोसरीतून विधानसभेची निवडणूक लढविणारच असे जाहीर केले आहे. भोसरीत महायुतील मित्र भाजपचा विद्यमान आमदार असल्याने राष्ट्रवादीला जागा मिळणार की गव्हाणे नाराजांची मोठ बांधून गव्हाणे अपक्ष मैदानात उतरणार हे पाहणे औत्सुक्याचे ठरणार आहे.महाराष्ट्रातील विधानसभेचा कार्यकाळ 26 नोव्हेंबर रोजी संपत असल्याने लोकसभेनंतर विधानसभेच्या निवडणुकीच्या हालचालींनी वेग घेतला आहे. अजित गव्हाणे यांनी भाजपाचे दिवंगत ज्येष्ठ नेते अंकुश लांडगे यांच्या मार्गदर्शनाखाली राजकीय धडे गिरवायला सुरुवात केली. त्यांनी पिंपरी-चिंचवड महापालिकेत स्थायी समितीचे अध्यक्षपद भूषविले आहे. एकत्रित राष्ट्रवादी असताना गव्हाणे हे शहर राष्ट्रवादीचे अध्यक्ष होते. त्यानंतर बदललेल्या राजकीय घडामोडीनंतर त्यांनी उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्यासोबत राहणे पसंत केले. त्यामुळे त्यांच्याकडे राष्ट्रवादी अजित पवार गटाच्या शहराध्यक्षपदाची जबाबदारी कायम राहिली. उच्चशिक्षित उद्योजक मृदु स्वभावाचा आणि सर्वांना बरोबर घेऊन काम करणारा संघटक अशी गव्हाणे यांची ओळख आहे.तुलनेने भोसरी मतदारसंघात लोकसभा निवडणुकीत पोलिंग बूथ यंत्रणेवर अजित गव्हाणे यांच्या मायक्रो प्लॅनींगमुळे लोकसभेत विरोधी उमेदवारापेक्षा घड्याळाचा गजर अधिकचा झाला. गव्हाणे यांनी नुकतेच मी अनेक वर्षापासून भोसरी विधानसभा लढविण्याची तयारी करीत असून निवडणूक लढविणारच आहे हे जाहीर केले. तेव्हापासून समाजमाध्यमांवर त्यांच्या समर्थकाकडून त्या पद्धतीच्या पोस्ट प्रसारीत होत आहेत. विधानसभेच्या होणाऱ्या निवडणुकीत महायुतीत भाजपा शिवसेना शिंदे गट आणि राष्ट्रवादी अजित पवार गट हे एकत्र आहेत. विद्यमान आमदार भाजपाचा असल्याने भाजपाला जाऊ शकते.अजित पवारांना भोसरीची जागा खेचण्यात यश मिळाले तर अजित गव्हाणे हेच उमेदवार असू शकतील. अन्यथा ते अन्य पक्षाचा विचार करतात की अपक्ष लढणे पसंत करतात, हे पाहणे औत्सुक्याचे ठरणार आहे.

### विलास लांडे यांच्या भूमिकेकडे लक्ष!

आता लांडे विधानसभा निवडणूक लढविण्याची शक्यता नाही. कारण, त्यांना सलगदोनवेळा पराभवाला सामोरे जावे लागले आणि आपला भविष्यातील राजकीय वारसदार अजित गव्हाणे हेच असतील असे यापूर्वीच जाहीर केले आहे. त्यामुळे लांडे यांचे पाठबळ गव्हाणे यांना मिळू शकते. विलास लांडे यांनी पिंपरी-चिंचवड शहराचे महापौरपद भूषविले आहे. पत्नी मोहिनी लांडे या देखील महापौर होत्या. विलास लांडे दोन वेळा आमदार म्हणून निवडून आले आहेत. मतदार संघात त्यांचा जनसंपर्क मोठा आहे. त्यांना मानणारा वर्ग आहे.शिवाय लांडे हे गव्हाणे यांचे अतिशय जवळचे नातेवाईक आहेत.

## पिंपरी-चिंचवडमध्ये महाविकास आघाडीच्या उमेदवारीवर

# अजित पवार समर्थकांचा ‘डोळा’!

### शहरातील राजकारणात आगामी 15 दिवसांत भूकंप; अजित पवार समर्थक ‘मविआ’ च्या गळाला

। पिंपरी ।महाईन्यूज । प्रतिनिधी।

**लोकसभा निवडणुकीतील भव्य यशानंतर राज्यात राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरद पवार गटाचा ‘स्ट्राईक रेट’ सर्वाधिक असल्यामुळे आगामी विधानसभा निवडणुकीकरिता ‘इनकमिंग’ ला उधाण आले आहे. शहरातील पिंपरी, चिंचवड आणि भोसरी मतदार संघामध्ये महायुतीचे विद्यमान आमदार आहेत. त्यामुळे राष्ट्रवादी अजित पवार गटातील तुल्यबळ नेत्यांना संधी मिळेल, याची अनिश्चितता आहे. परिणामी, अजित पवार गटातील तीव्र इच्छुकांनी महाविकास आघाडीच्या तिकीटांवर ‘डोळा’ ठेवला आहे.**




पिंपरी-चिंचवडमध्ये “राष्ट्रवादी म्हणजे अजित पवार’’ अशी स्थिती होती. पण, लोकसभा निवडणुकीनंतर समीकरण बदलले. शरद पवार गटाचा आत्मविश्वास प्रचंड वाढला आहे. वाऱ्याची दिशा ओळखून अजित पवार आणि भाजपासोबत महायुतीमध्ये गेलेले तगडे ‘फलंदाज’ आता ‘बॅक टू पॅव्हेलिअन’ पहायला मिळणार आहेत. विशेष म्हणजे, आमदारकीसाठी तीव्र इच्छुक असलेल्या या दिग्गजांनी आता महाविकास आघाडीतील शरद पवार गट आणि उद्धव ठाकरे गटाकडे प्रचंड ‘फिल्डिंग’ लावली आहे.

आगामी १५ दिवसांत शहरातील राजकीय वर्तुळात मोठा भूकंप होणार असून, अजित पवार गटातील २० ते २५ आणि भाजपामधील किमान ६ माजी नगरसेवक राष्ट्रवादी शरद पवार गटामध्ये प्रवेश करणार आहेत. यामध्ये दोन मातब्बर नेत्यांचा समावेश आहे. किंबहुना, राष्ट्रवादीचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील आणि आमदार रोहीत पवार यांच्यासह महाविकास आघाडीच्या प्रमुख नेत्यांशी चर्चेची एक फेरी पूर्ण झाली आहे. “पिंपरी-चिंचवडमधील तीनही विधानसभा मतदार संघात आमच्यासोबत येणाऱ्या इच्छुकांना संधी द्या. महायुतीला आस्मान दाखवू..’’ अशा प्रकारची ग्वाही संबंधित मातब्बर नेत्यांनी मविआच्या प्रमुख नेत्यांना दिल्याचे विश्वसनीय सूत्रांकडून समजले.



## चिंचवडमध्ये ‘तुतारी’ला पसंती

चिंचवड विधानसभा मतदार संघात भाजपाच्या विद्यमान आमदार अश्विनी जगताप आहेत. या मतदार संघातून भाजपाचेच शहराध्यक्ष शंकर जगताप यांनीही निवडणूक लढवण्याचा निर्धार केला आहे. यासोबत अजित पवार गटातील माजी विरोधी पक्षनेते नाना काटे, माजी नगरसेवक भाऊसाहेब भोईर यांनीही लढण्याचा निर्धार केला आहे. त्यामुळे महाविकास आघाडीतील उमेदवारीवर वर्णी लावण्यासाठी महायुतील इच्छुकांची धडपड सुरू झाली आहे. विशेष म्हणजे हा मतदार संघ ‘तुतारी’ ऐवजी मशालवर लढवण्यासाठी इच्छुकांची पहिली पसंती आहे, असा दावा केला जातो. मावळ लोकसभा मतदारसंघातील निवडणुकीत ‘मशाल’ चिन्हावर महाविकास आघाडीला पराभवाचा सामना करावा लागल्यामुळे विधानसभा निवडणुकीत ‘तुतारी’ फुंकण्याचा कयास आहे.

## पिंपरीत ‘मशाल’ पेटणार...

पिंपरी विधानसभा मतदार संघात सध्या राष्ट्रवादी अजित पवार गटाचे आमदार आण्णा बनसोडे आहेत. महाविकास आघाडीच्या जागावाटपामध्ये हा मतदार संघ ठाकरे गटाला सुटावा आणि आपली वर्णी लागावी म्हणून अजित पवार यांच्या ‘गुड बॉक्स’मधील एक ज्येष्ठ माजी नगरसेविका यांनी ‘मातोश्री’वर वारी केली आहे. या मतदार संघातून ‘मशाल’ चिन्हावर लढण्यासाठी सर्व नितींचा अवलंब करण्याची तयारी आहे. विशेष म्हणजे, अजित पवार गट महायुतीमध्ये सामील झाला नसता, तर राष्ट्रवादीची उमेदवारी याच नगरसेविकेला निश्चित मानली जात होती. त्यामुळे आता बदललेल्या समीकरणानुसार, अजित पवार यांच्या निकटवर्ती नगरसेविका ‘मशाल’ चिन्हावर लढण्यासाठी सज्ज झाल्या आहेत.

## भोसरीमध्ये तुतारी अन् मशाल

भोसरी विधानसभा मतदार संघामध्ये भाजपाचे विद्यमान आमदार महेश लांडगे यांच्यामुळे अजित पवार गटाचे माजी आमदार विलास लांडे आणि शहराध्यक्ष अजित गव्हाणे यांची अडचण झाली आहे. त्यामुळे या दोन्ही नेत्यांना निवडणूक लढवायची असेल, तर महाविकास आघाडीचे तिकीट खेचून आणावे लागणार आहे. जागा वाटपामध्ये हा मतदार संघ कोणत्या पक्षाला जाणार? याबाबत अद्याप सुस्पष्टता नाही. त्यामुळे ‘मातोश्री’ आणि ‘मोतीबाग’ अशा दोन्ही ठिकाणी इच्छुकांनी ‘फिल्डिंग’ लावल्याचे विश्वनीय सूत्रांकडून समजले. काहीही झाले, तरी या मतदार संघात माजी आमदार विलास लांडे यांची भूमिका निर्णायक ठरणार आहे, असे निरीक्षण राजकीय जाणकारांनी नोंदवले आहे.


---

## इंद्रायणी प्रदूषण मुक्तीसाठी ‘कॉमन ॲक्शन प्लॅन’ची गरज!

### आ. महेश लांडगे यांची भूमिका; पावसाळी अधिवेशनामध्ये सरकारचे लक्ष वेधणार

। पिंपरी ।महाईन्यूज । प्रतिनिधी।

**इंद्रायणी नदी प्रदूषण आणि पुनरूज्जीवन हा पिंपरी-चिंचवडसह सभोवतालच्या परिसरासाठी अत्यंत कळीचा मुद्दा बनला आहे. गेल्या अनेक वर्षांपासून नदी सुधार प्रकल्पासाठी पाठपुरावा सुरू असून, पिंपरी-चिंचवड महापालिका हद्दीतील नदीकाठाच्या पुनरूज्जीवनाचे काम प्रगतीथावर आहे. मात्र, महापालिका, पाटबंधारे विभाग, पीएमआरडीए, एमआयडीसी, लोणावळा नगरपरिषद, देहू नगरपरिषद आणि आळंदी नगरपरिषद यास पुणे जिल्हा प्रशासन अशा सर्व शासकीय अस्थापनांच्या माध्यमातून ‘कॉमन ॲक्शन प्लॅन’ हाती घेवून त्याची प्रभावी अंमलबजावणी केल्याशिवाय नदी प्रदूषणाच्या विळख्यातून मुक्त होणार नाही, अशी भूमिका भाजपा आमदार महेश लांडगे यांनी घेतली आहे.**




पिंपरी-चिंचवड शहरातून इंद्रायणी व पवना अशा दोन नद्या वाहतात. शहराची लोकसंख्या सुमारे ३० लाखांपेक्षा जास्त आहे. नदीपात्रामध्ये मोठ्या प्रमाणात सांडपाणी, घनकचरा, प्लॅस्टिक कचरा तसेच नदीच्या दोन्ही बाजुने राडारोडा टाकला जात आहे. नदीचे वाढते प्रदूषण यामुळे जलसृष्टी धोक्यात आली असून, नागरी आरोग्याचा प्रश्न निर्माण झाला आहे. त्यामुळे नदी पुनरुज्जीवन प्रकल्पाचा प्रकल्प अहवाल (DPR) तयार करुन त्याची प्रभावीपणे अंमलबजावणी करण्यासाठी २०१८ मध्ये प्रकल्प सल्लागार संस्थेची नियुक्ती केली आहे. या कामाला गती देण्याची अपेक्षा आहे. पिंपरी-चिंचवड इंद्रायणी नदीची शहरातील लांबी : २०.६ किमी असून, नदी काठची एक बाजू महापालिका व दुसरी बाजु पीएमआरडीए कार्यक्षेत्रात येते.

त्यामुळे नदीसुधार प्रकल्प संयुक्तपणे राबवण्यात येत आहे. PMRDA मार्फत लांबीच्या प्रमाणात खर्च देणेबाबत व काम करणेसाठी ना-हरकत दाखला देणे आवश्यक आहे. या तांत्रिक बाजु पूर्ण झाल्यास नदी सुधार प्रकल्पाला गती मिळणार आहे.

पिंपरी-चिंचवड महापालिकेने इंद्रायणी नदी काठावर सांडपाणी प्रक्रिया प्रकल्प प्रस्तावित केले आहेत. जे प्रकल्प कार्यान्वयीत आहेत. त्याद्वारे सांडपाणी प्रक्रिया करुनच नदी पात्रात सोडले जाते. तसेच, नदी पात्रातील अतिक्रमण हटवण्याची मोहीमसुद्धा सुरू आहे. मात्र, याच धर्तीवर लोणावळा नगरपरिषद, वडगाव नगर पंचायत, तळेगाव दाभाडे नगर परिषद, देहुरोड कॅन्टोन्मेंट, देहू नगर पंचायत आणि आळंदी नगर परिषद यासह पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण, एमआयडीसी व जिल्हाधिकारी प्रशासन यांनी एकत्रितपणे नदी सुधार प्रकल्पावर काम करण्याची आवश्यकता आहे. इंद्रायणी नदी प्रदूषणाचा उगमापासून वढू-तुळापूर येथील संगमापर्यंत असलेले स्थानिक स्वराज्य संस्था जबाबदार आहेत. हा केवळ पिंपरी-चिंचवड महापालिकेशी संबंधित प्रश्न नाही.

## असा आहे नदी सुधार प्रकल्प!

नदी पुनरुज्जीवन प्रकल्पामध्ये नदीकाठ सुशोभिकरण, आवश्यक ठिकाणी पूरनियंत्रणासाठी गॅबियन वॉल, R.E.Wall बांधणे, नदीच्या कडेने मोठ्या व्यासाची आर.सी.सी. इंटरसिप्टर सिव्हर लाईन, पंपिंग स्टेशनद्वारे सांडपाणी मैलाशुद्धीकरण प्रकल्पात नेणे, घरगुती व औद्योगिक सांडपाण्यावर प्रक्रिया करण्यासाठी मोड्युलर प्लॅंट बसवण्याची आवश्यकता आहे. नदीशी लोकांचा संपर्क, वृक्षारोपण, उद्यान विकास, सायकल मार्ग, फूटपाथ, सुशोभिकरण, स्मशान भूमी, स्वच्छतागृह, विसर्जन घाट अशा सुविधा करण्याचे प्रस्तावित आहे. जागेच्या उपलब्धतेनुसार, प्रकल्पाचा देखभाल व दुरूस्तीचा खर्च भागवण्यासाठी नदीकाठी आकर्षक थीमपार्क, रेस्टॉरंट व विविध मनोरंजनाची केंद्र उभारणे प्रस्तावित आहे.

# बांगलामैत्रीकडून फलदायी अपेक्षा



## भूमिका

**नरेंद्र मोदी यांच्या पंतप्रधानपदाच्या तिसऱ्या कार्यकाळाअंतर्गत, भारताला भेट देणाऱ्या पहिल्या राष्ट्रप्रमुख शेख हसिना ठराव्यात हा योगायोग नाही. गेली दहा वर्षे मोदी आणि हसिना यांनी आपापल्या देशांचे पंतप्रधान म्हणून दोन देशांतील संबंध वृद्धिंगत करण्यास नेहमीच प्राधान्य दिले. काही दिवसांपूर्वी शेख हसिना मोदी यांच्या शपथविधीस उपस्थित होत्या.**

नेपाळ, श्रीलंका या देशांशी संबंधांमध्ये चढ-उतार येत असतात. पाकिस्तान आणि सध्या मालदीव यांच्याशी द्विपक्षी संबंधांमध्ये अभावानेही मैत्री आढळून येत नाही. अफगाणिस्तानमधील तालिबान सरकारलाच आपण मान्यता दिलेली नसल्यामुळे त्या देशाशी संबंधांच्या मूल्यांकनाला मर्यादा येतात. या परिस्थितीमध्ये सातत्याने चांगले संबंध असलेला शेजारी हे बिरूद बांगलादेशालाच लागू पडते. दक्षिण आशियात भारतापाठोपाठ दुसरी सर्वाधिक वेगाने विस्तारणारी अर्थव्यवस्था म्हणून बांगलादेशचे नाव घ्यावे लागेल. कोणत्याही विकसनशील अर्थव्यवस्थेप्रमाणे बांगलादेशलाही कच्चा माल, पायाभूत सुविधा, गुंतवणूक अशा घटकांची गरज सातत्याने भासत आहे. हे घटक भारताकडून पुरवले गेल्यास दोन्ही देशांमधील व्यापारी संबंध आणि परस्परलाभ सध्यापेक्षा कितीतरी अधिक वेगाने वाढेल. भारत-बांगलादेश द्विपक्षी व्यापार १४ अब्ज डॉलर (साधारण ११६८०० कोटी रुपये) इतका आहे.



त्या तुलनेत चीन-बांगलादेश द्विपक्षी व्यापार २४ अब्ज डॉलरपर्यंत (साधारण दोन लाख कोटी रुपयांच्या वर) पोहोचला आहे. पण चीन भरवशाचा नाही आणि त्या देशाचा बांगलादेशवरील कर्जभार चार अब्ज डॉलरवर पोहोचला आहे. त्या देशावरील एकूण परदेशी कर्जाच्या सहा टक्के इतके हे प्रमाण आहे, जे चिंताजनक ठरते. तेव्हा इतर अनेक घटकांप्रमाणेच चीनचे सावट भारत-बांगलादेश मैत्रीवरही आहेच. पण चीनप्रमाणे भारत प्रकल्प उभारणीसाठी कर्ज देऊन, नंतर परतफेडीसाठी सतावत नाही. वेळेत कर्जफेड न केल्यामुळे त्या देशातील फाइव्ह-जी दूरसंचार वाहिन्यांची उभारणी चीनने रोखून धरली आहे. भारत त्याऐवजी आधी कर्जपुरवठा (क्रेडिट लाइन) करून त्यातून सुविधांच्या उभारणीविषयी ऋणको देशाशी चर्चा करतो. अशा कर्जांचे प्रमाण व मूल्य फार नसले, तरी त्यातून निर्माण होणाऱ्या विश्वासाचा घटक महत्त्वाचा असतो. श्रीलंकेशीही भारताने या प्रकारे व्यवहार केलेला आहे. बांगलादेशबरोबर दहा मुद्द्यांवर सहकार्य करण्याबाबत मोदी आणि शेख हसिना यांच्यात चर्चा झाली. वीज, पाणी, रेल्वे, डिजिटल जोडणीच्या बरोरीने व्यापारसुलभ उपायांवरही काही महत्त्वाचे निर्णय लवकरच घेतले जातील अशी अपेक्षा आहे. यंदा या नेहमीच्या विषयांपलीकडे जाऊन संरक्षण क्षेत्रात परस्परांशी सहकार्य करण्याविषयी महत्त्वाची चर्चा झाली. अलीकडच्या बदलत्या सामरिक परिप्रेक्ष्यामध्ये व्यापारी भागीदारीला सामरिक भागीदारीची जोड देण्यास अनेक देश प्राधान्य देऊ लागले आहेत. बंगालच्या उपसागरात चीनच्या वाढत्या हालचालींवर नजर ठेवण्यासाठी बांगलादेशचे उत्तम सहकार्य भारताला मिळू शकते. दोन देशांमध्ये सहकार्य आणि सौहार्दाचे वातावरण असेल, तर त्याचा उपयोग विवाद निराकरणासाठीही झाला पाहिजे. सध्या तीस्ता पाणी वाटपाचा मुद्दा दोन्ही देशांमध्ये आणि त्यातही पश्चिम बंगाल व सिक्कीम या राज्यांच्या आक्षेपांमुळे वादग्रस्त ठरला आहे. तीस्ता खोऱ्याच्या व्यवस्थापनासाठी भारतीय तज्ज्ञांना ढाका येथे पाठवण्याचा प्रस्ताव भारताने मांडला आहे. तीस्ता नदीचे पाणी पश्चिम बंगालसाठी जितके महत्त्वाचे आहे, तितकेच ते उत्तर बांगलादेशसाठीही मोलाचे आहे. भारताने झटपट हालचाली केल्या नाहीत, तर तीस्ता खोऱ्यात पाणी व्यवस्थापनाच्या निमित्ताने 'घुसखोरी' करण्यास चीन टपलेला आहे. शेख हसिना यांनीही या मुद्द्यावर बांगलादेशच्या हितास प्राधान्य दिले जाईल, असे म्हटले आहे. ममता बॅनर्जी यांनी यापूर्वी मनमोहन सिंग सरकाच्या काळातही तीस्ता प्रकल्पास विरोध केला होता. हा विरोध अजिबात मावळलेला नाही हे त्यांच्या ताज्या वक्तव्यावरून दिसून येते. तीस्ता पाणीप्रश्न आणि बांगलादेशातून भारतात येणारे बेकायदा स्थलांतरित या दोन प्रश्नांवर दोन्ही देशांनी लवकरात लवकर तोडगा काढला पाहिजे. दोन सरकारांमध्ये गेली दहा वर्षे उत्तम संवाद आणि सौहार्द दिसून आला. त्याची परिणती आता प्रत्यक्ष कृतीत, प्रकल्प उभारणीत, व्यापारवृद्धीत दिसली पाहिजे.

## प्रासंगिक »

### नसणे आणि भासणे!

***लोकशाहीचे प्रेम, संस्थांचा आदर वर्तनातून दाखवून द्यावा लागतो. तसा तो वर्तनातून सिद्ध होत असल्यास लोकशाहीप्रेम मिरवावे लागत नाही...***

अलीकडच्या काळात या वास्तवाची जाणीव वारंवार करून द्यावी लागते. असे करावे लागण्याचे ताजे कारण म्हणजे आणीबाणी आणि तिचा दिला गेलेला संदर्भ. तत्कालीन पंतप्रधान इंदिरा गांधी यांनी २५ जून १९७५ च्या रात्री नागरिकांचे मूलभूत अधिकार स्थगित केले आणि त्यानंतर २१ महिने देशाने आणीबाणीचा वरवंटा अनुभवला. भारतीय लोकशाहीतील हा नि:संशय काळा अध्याय. त्याची पार्श्वभूमीही लक्षात घ्यावी अशी. श्रीमती गांधींविरोधात विरोधकांचे नेतृत्व करणारे जयप्रकाश नारायण यांनी त्या वेळी लष्करासही आंदोलनात ओढण्याचा केलेला प्रयत्न, लष्करी अधिकाऱ्यांनी सरकारी आदेशांचे पालन करू नये असे केलेले आवाहन आणि त्याआधीच्या अमेरिका आणि अरब संघर्षामुळे ठप्प झालेली जागतिक अर्थव्यवस्था आदींनी कावलेल्या इंदिरा गांधी यांनी राजकीय विरोधास तोंड देणे अशक्य झाल्याने थेट राज्यघटनाच स्थगित केली .

संविधान बदलाची भाषा भाजपच्या अनेक नेत्यांनी जाहीरपणे बोलून दाखवली होती. तसं झालं तर लोकशाहीचा गळा घोटला जाणार या जाणिवेतून सजग मतदारांनी इंडिया आघाडीला बळ देत भाजपचा उधळलेला वारू २४० वरच थोपून धरला.

# असलं' राजकारण चालणार नाही!

इंडिया आघाडीला बहुमत मिळालं नसलं तरी या आघाडीने भाजपचा आणि विशेषत: पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा नैतिक पराभव केला हे वास्तव आहे.जगातील सर्वांत मोठा पक्ष म्हणवणारा सत्ताधारी भाजप विरुद्ध जवळ फारशी साधनं नसलेला विरोधी पक्ष अशा विषम परिस्थितीतही भाजप पराभूत का झाला, हा प्रश्न अत्यंत महत्त्वपूर्ण ठरतो. गेल्या दहा वर्षांत भाजपने केलेला उन्माद पाहता जनता भाजपपासून दूर गेली असं त्याचं एका वाक्यात उत्तर आहे. आपण सांगू तसं लोक वागतील हा भाजपच्या भ्रमाचा भोपळा लोकांनीच फोडला. बेकारी, महागाई, चीनची घुसखोरी, अशांतता हे मुद्दे बाजूला ठेवून भाजप केवळ द्वेष आणि ध्रुवीकरणाच्या मुद्द्यांवर भर देत राहिला. पुणे ते नागपूर या ८५० कि.मीच्या पायी 'युवा संघर्ष यात्रे'च्या माध्यमातून मी लोकांचे प्रश्न जवळून बघितले होते. शेतमालाला भाव मिळत नसल्याने तसेच नैसर्गिक आपत्तींमुळे शेतकरी अडचणीत होता. बेकारी,



सरकारी भरती परीक्षांमध्ये होणारे घोटाळे यामुळे तरुणवर्गात असंतोष होता. राज्यातील उद्योग गुजरातला पळवणे, प्रादेशिक पक्ष फोडून त्यांचे अस्तित्व संपवण्याच्या प्रयत्नाबद्दल जनतेच्या मनात असंतोष खदखदत होता. हे सगळं युवासंघर्ष यात्रेत दिसून आलं होतं. पण भाजप त्यातल्या एकाही मुद्द्यावर ब्रदेखील काढत नव्हता. त्यामुळे जनता केवळ निवडणुकीची वाट पाहत होती. तिने निवडणुकीत भाजपचा 'करेक्ट कार्यक्रम' केला. दिंडोरीमधील सभेत आमचे सर्वोच्च नेते शरद पवार यांनी 'कांदा निर्यात बंदी उठवली पाहिजे' या मुद्द्यावर भर दिला. त्याच दिवशी मोदींची पिंपळगाव बसवंतमध्ये सभा झाली. ते कांद्यावर एक शब्दही न बोलता हिंदू-मुस्लीम करत राहिले. कांदा निर्यातबंदीने उद्ध्वस्त झालेल्या शेतकऱ्याला हे पटलं नाही. मराठवाड्यात प्रचारसभेत युवकांच्या हाताला काम कसं द्याल, आरक्षणाचे प्रश्न कसे सोडवाल यावर बोलण्याऐवजी पंतप्रधान नेहमीचेच ध्रुवीकरणाचे मुद्दे मांडत राहिले. दहा वर्षांपूर्वी ज्या दराने सोयाबीन विकलं त्याच दराने आज सोयाबीन विकावं लागत असेयाशिवाय महाराष्ट्राच्या अस्मितेला धक्का लागेल असंच भाजपचं वर्तन होतं. शिवसेना, राष्ट्रवादी हे पक्ष महाराष्ट्राचा, मराठी माणसाचा आवाज आहेत आणि सत्तेचा गैरवापर करत हाच आवाज दाबण्याचा प्रयत्न भाजपने केला. महाराष्ट्राच्या अस्मितेचा गळा कुणी घोटला जात असेल तर बघत बसायचं का, हा प्रश्न मला राज्यात अनेकांनी विचारला. यावरूनच महाविकास आघाडीच्या बाजूने जनमत असल्याचं दिसत होतं. भाजप आणि त्यांचे मित्र आपण निवडणूक सहज जिंकू या भ्रमात होते.

## ।। अभंगवाणी ।।



आजिवरी तुम्हां आम्हां नेणपण ।
कौतुकें खेळणें संग होता ॥१॥

आतां अनावर जालें अगुणाची ।
करूं नये तें चि करीं सुखें ॥२॥

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक संपादक अधिकराव दिवे- पाटील** यांनी छत्रपती शिवाजी महाराज गोल मंडई, गाळा क्र. ७९/८०, संत तुकारामनगर, पिंपरी, पुणे- 411018 येथे **'महाईन्यूज'**च्या पुणे विभागीय कार्यालयामधून प्रकाशित केले आहे. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक संपादक सहमत असतीलच असे नाही. **कार्यकारी संपादक : *वैष्णव जाधव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील)
एमएसएमई क्रमांक : MH-26-0158827. (विशेष सूचना: हा अंक प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.)


# बेट्या तुझा टांगा पलटवतोच!

## 13 जुलैनंतर काहीही ऐकून घेणार नाही : मनोज जरांगे

। मुंबई । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**राज्य सरकारसमोरचा मराठा आरक्षणाचा तिढा अद्याप कायम आहे. सगे-सोयऱ्यांच्या अंमलबजावणीवर मनोज जरांगे ठाम आहेत. त्यांनी सरकारला यासाठी १३ जुलैपर्यंतची मुदत दिली आहे. त्यांनी यासाठी उपोषणही सुरु केलं होतं. तर लक्ष्मण हाकेंनी ओबीसी आरक्षणासाठी उपोषण सुरु केलं. त्यानंतर आता मनोज जरांगेंनी भुजबळांवर जोरदार टीका केली आहे. बेट्या तुझा टांगा पलटी करणार असं म्हणत पुन्हा एकदा भुजबळांवर एकेरी भाषेत टीका केली आहे.**





“आता तुम्ही पलट्या मारायला लागले आहेत. मी पहिल्यापासून सांगतोय आमच्या व्याख्येप्रमाणे आरक्षण द्या. आधी ठीक आहे सांगतात, सगे-सोयऱ्यांची अंमलबजावणी करा नाहीतर करु नका. तुम्ही जर पलट्या मारल्या तर तुमचं सरकार मी पलटी केलंच म्हणून समजा.” असा इशाराच मनोज जरांगेंनी दिलाय.छगनभाऊ, तुला असा इंगा दाखवतो, तू आमच्या आमच्यात काडी लावतो का? मी तुझ्यापेक्षा जास्त पुढचा आहे. तू बळच रक्त जाळतो आहेस. बेट्या तुझा टांगा उलटवणार. तू जेवढं करशील तेवढा मराठा एक होत जाईल.” असं म्हणत भुजबळांवर मनोज जरांगेंनी पुन्हा टीका केली आहेकोणता तरी नेता सांगतोय म्हणून आपण बिघडायचं आणि रोष व्यक्त करायचा. आपल्याला एकमेकांचे चेहरे बघायचे आहेत, रामराम घालायचा आहे, शेतात एकमेकांना काही अडचण आली तर मदतीला जायचं आहे याच भूमिकेत आपल्याला राहायचं आहे, असे आवाहन तुम्ही आमची भूमिका समजून घ्या, आम्ही १५० वर्षांपासून आरक्षणात आहोत, पण आम्हाला हे माहिती नव्हतं की आम्ही आहोत. आता आम्हाला माहिती झालं आहे, त्यामुळे नोंदी पाहून तुम्हीही म्हटलं पाहिजे की द्या मराठा समाजाला आरक्षण.” असंही मनोज जरांगे म्हणाले.मनोज जरांगेंनी राज्य सरकारला सगे सोयऱ्यांसह मराठा समाजाच्या आरक्षणासाठी १३ जुलैपर्यंत मुदत दिली आहे. त्याबाबतही त्यांनी भाष्य केलं. मनोज जरांगे म्हणाले, “१३ जुलैनंतर सरकारचं काहीही ऐकून घेणार नाही, असे त्यांनी म्हटले. तुम्ही पलट्या मारल्या तर तुमचं सरकार म्या पलटी केलंच समजायचं” हे इतके दिवस बोललो नव्हतो. पण आता बोलणं आवश्यक आहे असंही मनोज जरांगेंनी म्हटलंय. उपोषणानंतर रुग्णालयात उपचार घेत असलेले मनोज जरांगे आज अंतरवाली सराटी गावात आले, त्यावेळी गावकऱ्यांना उद्देशून भाषण केलं. मी अंतरवलीत येण्यासाठी आसूसलेलो होतो, मरणाच्या शेवटच्या घटकासोबत मी समाजासोबतच राहणार असल्याचंही जरांगेंनी पुन्हा एकदा म्हटलं आहे.“आता तुम्ही पलट्या मारायला लागले आहेत. मी पहिल्यापासून सांगतोय आमच्या व्याख्येप्रमाणे आरक्षण द्या. आधी ठीक आहे सांगतात, सगे-सोयऱ्यांची अंमलबजावणी करा नाहीतर करु नका. तुम्ही जर पलट्या मारल्या तर तुमचं सरकार मी पलटी केलंच म्हणून समजा.” असा इशाराच मनोज जरांगेंनी दिलाय.छगनभाऊ, तुला असा इंगा दाखवतो, तू आमच्या आमच्यात काडी लावतो का? मी तुझ्यापेक्षा जास्त पुढचा आहे. तू बळच रक्त जाळतो आहेस. बेट्या तुझा टांगा उलटवणार. तू जेवढं करशील तेवढा मराठा एक होत जाईल.” असं म्हणत भुजबळांवर मनोज जरांगेंनी पुन्हा टीका केली..

### भुजबळांवर एकेरी भाषेत टीका

रोष व्यक्त करायचा. आपल्याला एकमेकांचे चेहरे बघायचे आहेत, रामराम घालायचा आहे, शेतात एकमेकांना काही अडचण आली तर मदतीला जायचं आहे याच भूमिकेत आपल्याला राहायचं आहे, असे आवाहन तुम्ही आमची भूमिका समजून घ्या, आम्ही १५० वर्षांपासून आरक्षणात आहोत, पण आम्हाला हे माहिती नव्हतं की आम्ही आहोत. आता आम्हाला माहिती झालं आहे, त्यामुळे नोंदी पाहून तुम्हीही म्हटलं पाहिजे की द्या मराठा समाजाला आरक्षण.” असंही मनोज जरांगे म्हणाले.मनोज जरांगेंनी राज्य सरकारला सगे सोयऱ्यांसह मराठा समाजाच्या आरक्षणासाठी १३ जुलैपर्यंत मुदत दिली आहे. त्याबाबतही त्यांनी भाष्य केलं. मनोज जरांगे म्हणाले, “१३ जुलैनंतर सरकारचं काहीही ऐकून घेणार नाही, असे त्यांनी म्हटले. तुम्ही पलट्या मारल्या तर तुमचं सरकार म्या पलटी केलंच समजायचं” हे इतके दिवस बोललो नव्हतो. पण आता बोलणं आवश्यक आहे असंही मनोज जरांगेंनी म्हटलंय. उपोषणानंतर रुग्णालयात उपचार घेत असलेले मनोज जरांगे आज अंतरवाली सराटी गावात आले, त्यावेळी गावकऱ्यांना उद्देशून भाषण केलं. मी अंतरवलीत येण्यासाठी आसूसलेलो होतो, मरणाच्या शेवटच्या घटकासोबत मी समाजासोबतच राहणार असल्याचंही जरांगेंनी पुन्हा एकदा म्हटलं आहे.

# पदवीधर, शिक्षक मतदारसंघांमध्ये आज मतदान

## भाजप, शिवसेना, काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेसची कसोटी

। मुंबई । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**विधान परिषदेच्या मुंबई पदवीधर तसेच शिक्षक, कोकण पदवीधर आणि नाशिक शिक्षक अशा चार मतदारसंघांमध्ये उद्या मतदान होणार आहे. पदवीधरांना मतदानाबाहेर मतदान केंद्रांपर्यंत आणण्याचे मोठे आव्हान सर्वच उमेदवारांसमोर आहे.**

पदवीधर आणि शिक्षक मतदारसंघांमध्ये बुधवारी मतदान होत असल्याने मतदारांना मतदान केंद्रांपर्यंत आणण्याचे सर्वच उमेदवारांसमोर आव्हान आहे. विशेषत: कोकण पदवीधर मतदारसंघ तर ठाण्यापासून पार सिंधुदुर्गमध्ये गोव्याची सीमा तर पालघरमध्ये गुजरातच्या सीमेपर्यंत पसरलेला असल्याने तेथे मतदानाची टक्केवारी वाढविणे हे जिकरीचे ठरते. सर्व राजकीय पक्ष आणि उमेदवारांना मतदारांपर्यंत पोहचण्यासाठी आपापली यंत्रणा कामाला लावली आहे. कोकण आणि नाशिकमध्ये तालुका पातळीवर उमेदवारांनी आपापल्या पक्षाच्या नेत्यांकडे जबाबदारी सोपविली आहे. जास्तीत जास्त मतदान घडवून आणण्यावर सर्वच उमेदवारांचा भर असेल. नोंदणी केलेले मतदार मतदानासाठी बाहेर पडतील यासाठी राजकीय पक्षांकडून खबरदारी घेतली जात आहे.मुंबई पदवीधर मतदारसंघात शिवसेना ठाकरे गटाचे अनिल परब, भाजपचे किरण शेलार यांच्यात मुख्यत्वे लढत होत आहे. मुंबई पदवीधर मतदारसंघात दीड लाखांच्या आसपास मतदार आहेत. गेली ३० वर्षे शिवसेनेच्या ताब्यात असलेला हा मतदारसंघ कायम ठेवण्याचे ठाकरे गटापुढे मोठे आव्हान आहे. यंदा भाजपचे किरण शेलार यांच्यासाठी भाजपने मुंबईतील आपली सर्व यंत्रणा कामाला लावली आहे. शिवसेना ठाकरे गटाने मुंबईतील आपल्या सर्व शाखांमधून हक्काचे मतदार मतदानासाठी येतील याची खबरदारी घेण्याचा आदेश दिला आहे.



### पदवीधर मतदारांना सुट्टी

मुंबई शिक्षक मतदारसंघात लोकभारतीचे सुभाष मोरे, शिवसेना ठाकरे गटाचे ज. मो. अभ्यंकर, भाजप पुरस्कृत शिवनाथ दराडे, राष्ट्रवादी अजित पवार गटाचे शिवाजीराव नलावडे, शिंदे गटाचे शिवाजी शेंडगे हे रिंगणात आहेत. सुमारे १५ हजार मतदार असलेल्या या मतदारसंघात जास्त नोंदणी केलेल्या उमेदवाराला विजयाची नेहमी संधी असते. कोकण पदवीधर मतदारसंघात भाजपचे विद्यमान आमदार निरंजन डावखरे आणि काँग्रेसचे रमेश कीर यांच्यात लढत होत आहे.

# इंडिया आघाडीमधून अनेक लोक येणार

## प्रफुल्ल पटेल : इंडिया आघाडी किती मजबूत आहे, हे येणारा काळच सांगेल

। नवी दिल्ली ।

वृत्तसंस्था : महाईन्यूज

**केंद्रात एनडीएच सरकार स्थापन झाल्यानंतर आता संसदेच्या पावसाळी अधिवेशनाला सुरुवात झाली असून आज अधिवेशनाचा दुसरा दिवस होता. नवनिर्वाचित खासदारांचा शपथविधी पार पडला आहे. आता लोकसभा अध्यक्षपदाची बुधवारी निवडणूक पार पडणार आहे. त्या पार्श्वभूमीवर एनडीए आणि इंडिया आघाडीकडून उमेदवार देण्यात आले आहेत. या अनुषंगाने काँग्रेस आणि भारतीय जनता पार्टीने आपआपल्या खासदारांना संसदेत उपस्थित राहण्याची सूचना दिल्या आहेत**



लोकसभा अध्यक्षपदासाठी अटीतटीचं राजकारण सुरू असतानाच आता राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाचे नेते प्रफुल पटेल यांनी इंडिया आघाडीबाबत मोठं विधान केलं आहे. “काही वेळ जाऊद्या, त्यानंतर इंडिया आघाडीतील अनेक लोक पंक्चर होऊन आमच्याकडे (एनडीए) येतील”, असा मोठा दावा प्रफुल पटेल यांनी केला आहे. विरोधी पक्षातील लोक जर हा विचार करत असतील की आमच्यामधील काही लोकांना पंक्चर करण्याचा त्यांचा विचार असेल तर हे लोक यशस्वी होणार नाहीत. आम्ही एनडीएबरोबरच राहणार आहोत. मात्र, इंडिया आघाडीमधून अनेक लोक येणार आहेत.अजून थोडा वेळ जाऊद्या.नवा उत्साह आहे,त्यामुळे ते सध्या अशा पद्धतीचं बोलत आहेत. मात्र, येणारा वेळ सांगेल की इंडिया आघाडीमधील किती लोक पंक्चर होऊन आमच्याबरोबर (एनडीए) येतील.इंडिया आघाडी किती मजबूत आहे, हे येणारा काळच सांगेल”, असं म्हणत प्रफुल पटेल यांनी इंडिया आघाडीवर हल्लाबोल केला आहे.लोकसभा अध्यक्षपदाच्या निवडणुकीबाबत बोलताना प्रफुल्ल पटेल म्हणाले, “त्याचं सरकार स्थापन होतं. त्यांचाच लोकसभेचा अध्यक्ष असतो.

एनडीएचे २९२ खासदार आहेत. तसेच अजून काही लोक आम्हाला साथ द्यायला तयार आहेत. मात्र, विरोधकांना वाटतं आहे की लोकसभेच्या अध्यक्षपदाची निवडणूक लढावी. त्यामुळे लोकशाहीमध्ये हे होऊ शकतं. मात्र, उद्या पर्यंत इंडिया आगाडीने ही निवडणूक लढवण्यासंदर्भात विचार करावा”, असं प्रफुल पटेल म्हणाले.लोकसभा अध्यक्षपदाच्या निवडीवरून अटीतटीचं राजकारण पाहण्यास मिळत आहे. एनडीएकडून ओम बिर्ला यांनी पुन्हा एकदा लोकसभेच्या अध्यक्षपदासाठी अर्ज दाखल केला. तसेच इंडिया आघाडीकडून लोकसभा अध्यक्षपदासाठी काँग्रेस खासदार के.सुरेश यांनी उमेदवारी अर्ज दाखल केला आहे. त्यामुळे आता लोकसभा अध्यक्षपदासाठी बुधवारी (२६ जून) सकाळी ११ वाजता निवडणूक होणार आहे.लोकसभा अध्यक्षपदासाठी अटीतटीचं राजकारण सुरू असतानाच आता राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाचे नेते प्रफुल पटेल यांनी इंडिया आघाडीबाबत मोठं विधान केलं आहे. “काही वेळ जाऊद्या, त्यानंतर इंडिया आघाडीतील अनेक लोक पंक्चर होऊन आमच्याकडे (एनडीए) येतील”, असा मोठा दावा प्रफुल पटेल यांनी केला आहे. विरोधी पक्षातील लोक जर हा विचार करत असतील की आमच्यामधील काही लोकांना पंक्चर करण्याचा त्यांचा विचार असेल तर हे लोक यशस्वी होणार नाहीत. आम्ही एनडीएबरोबरच राहणार आहोत. मात्र, इंडिया आघाडीमधून अनेक लोक येणार आहेत. त्यामुळे ते सध्या अशा पद्धतीचं बोलत आहेत. मात्र, येणारा वेळ सांगेल की इंडिया आघाडीमधील किती लोक पंक्चर होऊन आमच्याबरोबर (एनडीए) येतील

### लोकसभा अध्यक्षपदासाठी उद्या निवडणूक

. इंडिया आघाडी किती मजबूत आहे, हे येणारा काळच सांगेल”, असं म्हणत प्रफुल पटेल यांनी इंडिया आघाडीवर हल्लाबोल केला आहे.लोकसभा अध्यक्षपदाच्या निवडणुकीबाबत बोलताना प्रफुल्ल पटेल म्हणाले, “त्याचं सरकार स्थापन होतं. त्यांचाच लोकसभेचा अध्यक्ष असतो. एनडीएचे २९२ खासदार आहेत. तसेच अजून काही लोक आम्हाला साथ द्यायला तयार आहेत. मात्र, विरोधकांना वाटतं आहे की लोकसभेच्या अध्यक्षपदाची निवडणूक लढावी. त्यामुळे लोकशाहीमध्ये हे होऊ शकतं.मात्र, उद्या पर्यंत इंडिया आगाडीने ही निवडणूक लढवण्यासंदर्भात विचार करावा”, असं प्रफुल पटेल म्हणाले.लोकसभा अध्यक्षपदाच्या निवडीवरून अटीतटीचं राजकारण पाहण्यास मिळत आहे. एनडीएकडून ओम बिर्ला यांनी पुन्हा एकदा लोकसभेच्या अध्यक्षपदासाठी अर्ज दाखल केला. केंद्रात एनडीएच सरकार स्थापन झाल्यानंतर आता संसदेच्या पावसाळी अधिवेशनाला सुरुवात झाली असून आज अधिवेशनाचा दुसरा दिवस होता. नवनिर्वाचित खासदारांचा शपथविधी पार पडला आहे. आता लोकसभा अध्यक्षपदाची बुधवारी निवडणूक पार पडणार आहे. त्या पार्श्वभूमीवर एनडीए आणि इंडिया आघाडीकडून उमेदवार देण्यात आले आहेत. या अनुषंगाने काँग्रेस आणि भारतीय जनता पार्टीने आपआपल्या खासदारांना संसदेत उपस्थित राहण्याची सूचना दिल्या आहेत

# लोकसभा अध्यक्षपदासाठी आज निवडणूक

## काँग्रेसकडून खासदारांना व्हिप जारी, संसदेत हजर राहण्याच्या सूचना

। नवी दिल्ली ।

वृत्तसंस्था : महाईन्यूज

**संसदेचं पावसाळी अधिवेशन सध्या सुरू आहे. आज अधिवेशनाचा दुसरा दिवस होता. सर्व नवनिर्वाचित खासदारांचा शपथविधी पार पडला. मात्र, लोकसभा अध्यक्षपदाच्या निवडीवरून अटीतटीचं राजकारण पाहण्यास मिळत आहे. एनडीएकडून ओम बिर्ला यांनी पुन्हा एकदा लोकसभेच्या अध्यक्षपदासाठी अर्ज दाखल केला.**

तसेच इंडिया आघाडीकडून लोकसभा अध्यक्षपदासाठी काँग्रेस खासदार के.सुरेश यांनी उमेदवारी अर्ज दाखल केला आहे. त्यामुळे आता लोकसभा अध्यक्षपदासाठी बुधवारी (२६ जून) सकाळी ११ वाजता निवडणूक होणार आहे. या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर काँग्रेसकडून आता सर्व खासदारांना व्हिप जारी करण्यात आला आहे. काँग्रेसने व्हिप जारी करत बुधवारी सर्व खासदारांना संसदेत हजर राहण्याच्या सूचना दिल्या आहेत. तीन ओळीचा हा व्हिप असून काँग्रेस पक्षाच्या सर्व खासदारांना उद्या सकाळी ११ वाजता सभागृहात उपस्थित राहण्याच्या सूचना दिल्या आहेत. तसेच उद्या सकाळी ११



वाजेपासून ते संसदेचे कामकाज संपेपर्यंत सभागृहात हजर राहण्याचे आवाहन करण्यात आले आहे. लोकसभेत उद्या महत्वाचा मुद्दा उपस्थित करण्यात येईन, त्यासाठी काँग्रेसच्या सर्व खासदारांनी संसदेत उपस्थित राहावे, असं व्हिप जारी केलेल्या पत्रात म्हटलं आहे.दरम्यान, लोकसभा अध्यक्षपदासाठी इंडिया आघाडीकडून काँग्रेस खासदार के.सुरेश यांना उमेदवारी देण्यात आली आहे. तर एनडीएकडून ओम बिर्ला यांनी पुन्हा एकदा लोकसभेच्या अध्यक्षपदासाठी अर्ज दाखल केला आहे. त्यामुळे बुधवारी (२६ जून) रोजी लोकसभेच्या अध्यक्षपदासाठी निवडणूक होणार आहे.

### राहुल गांधी काय म्हणाले?

भारताचा आत्तापर्यंतचा इतिहास पाहता याआधी फक्त दोन वेळा अध्यक्षपदासाठी निवडणूक घेण्यात आली आहे. त्यात सर्वात पहिली १९५२ ची निवडणूक झाल्यानंतर पहिल्यांदा अध्यक्षपदासाठी निवडणूक झाली. त्यानंतर आणीबाणीनंतर झालेल्या निवडणुकीत अशाच प्रकारे अध्यक्षपदावर सहमती न झाल्यामुळे निवडणूक घेण्यात आली होती. त्यानंतर थेट यावेळी लोकसभा अध्यक्षपदासाठी निवडणूक होणार आहे. लोकसभेच्या अध्यक्षपदासाठी एनडीए आणि विरोधकांमध्ये एकमत झाल्याचं बोललं जात होतं. मात्र, इंडिया आघाडीकडून उपाध्यक्षपदासाठी आग्रह धरला.

# टायगर श्रॉफ चेहरा लपवत आले माध्यमांसमोर

बॉलीवूडचा सुपरस्टार अक्षय कुमार आणि टायगर श्रॉफ यांचा आगामी चित्रपट 'बडे मियाँ छोटे मियाँ' ईदच्या मुहूर्तावर प्रदर्शित होणार आहे. दोन्ही स्टार्स वेगवेगळ्या शहरांत जाऊन या चित्रपटाचे दणक्यात प्रमोशन करताना दिसतायत. अनेकदा माध्यमांसमोर येताना आपण अक्षय आणि टायगरला वेगवेगळ्या रूपांत पाहिलंच असेल; पण आज दोघंही माध्यमांसमोर येताना आपला चेहरा लपवत आले होते. या दोघांचा हा व्हिडीओ सध्या सोशल मीडियावर मोठ्या प्रमाणात व्हायरल होतोय. बडे मियाँ अक्षय कुमार आणि छोटे मियाँ टायगर श्रॉफचा एक व्हिडीओ समोर आला आहे. त्यात अक्षय आणि टायगरने पापाराझींसमोर येताच आपला चेहरा झाकला आणि लपत लपत ते माध्यमांसमोर आले. अक्षय आणि टायगरच्या अशा वागण्यामुळे सगळेच गोंधळात पडले. अशातच एकानं विचारलं, "नक्की काय झालं सर?" तेवढ्यात दुसरा पापाराझी म्हणाला, "हा नक्कीच ट्रेंड आहे." त्यानंतर हसत हसत अक्षय आणि टायगरनं एकमेकांना मिठी मारली. अशा प्रकारे दोघांनी पापाराझींबरोबर प्रँक केला, असं लक्षात आलं.व्हायरल झालेल्या या व्हिडीओवर नेटकऱ्यांनी आपल्या प्रतिक्रिया दिल्या आहेत, "खिलाडीशिवाय अशी मस्करी कोणीच करू शकत नाही." अशी कमेंट एकानं केली. तर, काही जण म्हणाले, "चेहरा लपवावा लागेल, असं कामच का करायचं?"दरम्यान, अक्षय कुमार आणि टायगर श्रॉफ अभिनीत 'बडे मियाँ छोटे मियाँ' चित्रपट १२ मार्च रोजी प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे.

# सैनिकांच्या शौर्याची गाथा सांगणारा 'योद्धा'

भारताच्या सुरक्षिततेची शपथ घेतलेला सैनिक आपले कर्तव्य पूर्ण करण्यासाठी वेळप्रसंगी आपल्या प्राणांची आहुती देऊ शकतो आणि शत्रूचा जीवही घेऊ शकतो. भारतीय सैनिकांच्या शौर्याची गाथा सांगणारा 'योद्धा' हा अभिनेता सिद्धार्थ मल्होत्रा याचा आगामी चित्रपट १५ मार्च रोजी संपूर्ण भारतात प्रदर्शित होणार आहे. एका प्रवासी विमानाचे अपहरण करण्यात आल्यानंतर त्यातील प्रवाशांना सुखरूप बाहेर काढत अपहरण करणाऱ्या दहशतवाद्यांना अद्दल घडवणाऱ्या सैनिकाची कथा या चित्रपटात पाहायला मिळणार आहे. करण जोहर निर्मित या चित्रपटाचं दिग्दर्शन सागर आंब्रे आणि पुष्कर ओझा यांनी केलं असून राशी खन्ना, दिशा पटानी आणि रोनीत रॉय यांच्या यात प्रमुख भूमिका आहेत. या चित्रपटाच्या ट्रेलर प्रदर्शनाच्या निमित्ताने अभिनेता सिद्धार्थ मल्होत्रा याने प्रसिद्धीमाध्यमांशी मनमोकळ्या गप्पा मारल्या.या चित्रपटाबद्दल आणि आपल्या पात्राबद्दल बोलताना सिद्धार्थ म्हणाला, 'योद्धा या चित्रपटाचा ट्रेलर आम्ही ३७ हजार फूट उंचीवर विमानामध्ये प्रदर्शित केला. विमान हवेत उडत असताना अपहरण करण्यात आले तर त्यातील प्रवाशांच्या मनात उमटणारी भीती कशी असते हे या ट्रेलरच्या माध्यमातून आम्हाला मांडायचे होते. हा चित्रपट एका सैनिकावर आधारित आहे, ज्याचं त्याच्या देशावर फार प्रेम आहे आणि त्या देशाच्या आणि देशातील नागरिकांच्या सुरक्षेसाठी तो काहीही करू शकतो'. 'कोणताही चित्रपट करताना त्यातील पात्र आपलंसं वाटणं गरजेचं असतं.

# मिस वर्ल्ड 2024 सोहळा

७१वा 'मिस वर्ल्ड २०२४'चा महाअंतिम सोहळा जिओ वर्ल्ड कन्व्हेक्शन सेंटरमध्ये सुरू झाला आहे. १९९७ साली हा सोहळा भारतात झाला होता. तब्बल २८ वर्षांनंतर 'मिस वर्ल्ड २०२४'चा महाअंतिम सोहळा आज भारतात होतं आहे. या सौंदर्यवती स्पर्धेत भारताच प्रतिनिधित्व २२ वर्षांची सिनी शेट्टी करत आहे. त्यामुळे आजची रात्र भारतीयांसाठी खूप महत्त्वाची आहे. सौंदर्य, आत्मविश्वास, सादरीकरण, बुद्धिमत्ताच्या बळावर कोणती सौंदर्यवती बाजी मारून 'मिस वर्ल्ड २०२४'चा किताब मिळवते? याकडे सगळ्यांचं लक्ष लागून राहिलं आहे. 'मिस वर्ल्ड २०२४'चा महाअंतिम सोहळा सुरू झाला असून अनेक बॉलीवूड कलाकार उपस्थित राहिले आहेत. उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या पत्नी अमृता फडणवीस यांनी देखील या सोहळ्याला हजेरी लावली आहे. त्या या स्पर्धेचं परीक्षण करणार आहेत.या स्पर्धेच्या परीक्षणसाठी १२ सदस्यांचं पॅनेल आहे. यामध्ये बॉलीवूड अभिनेत्री क्रिती सेनॉन, पूजा हेगडे, मिस वर्ल्ड ऑर्गनायझेशनच्या सीईओ ज्युलिया एव्हलिन मॉर्ले, अमृता फडणवीस, साजिद नाडियाडवाला, माजी भारतीय क्रिकेटपटू हरभजन सिंग यांचा समावेश आहे. हे सदस्य 'मिस वर्ल्ड २०२४'चं परीक्षण करणार आहेत.



# मी दीपिकाला संधी दिली :फराह

२००७ रोजी प्रदर्शित झालेला फराह खानचा 'ओम शांती ओम' चित्रपट अजूनही लोकप्रिय आहे. शाहरुख खान अभिनीत या चित्रपटात नायिकेची भूमिका साकारत दीपिका पदुकोणने हिंदी सिनेसृष्टीत पदार्पण केले. कथानक, संवाद व गाण्यांमुळे हा चित्रपट प्रेक्षकांच्या पसंतीस उतरला. त्यावेळी 'ओम शांती ओम'ने बॉक्स ऑफिसवर बक्कळ कमाई केली होती. परंतु, 'मॅशेबल इंडिया'ला दिलेल्या मुलाखतीत 'ओम शांती ओम' चित्रपटात दीपिका पदुकोणला फक्त शाहरुख खानमुळे संधी मिळाल्याचे दिग्दर्शिका फराह खानने सांगितले. कास्टिंग दिग्दर्शक मुकेश छाबरा यांच्याशी संवाद साधताना फराह म्हणाली, "नवोदित कलाकारांना केव्हाही संधी मिळू शकते; परंतु तुम्ही या संधीसाठी तयार आहात की नाही हे तुम्हाला माहीत असायला हवं. सगळे जण म्हणतात की, योग्य भूमिका मिळेपर्यंत वाट पाहावी. पण, मला असं वाटतं की, ते दिवस गेलेत आता. लहान-मोठं काम असलं तरी तुम्ही अभिनय करीत राहिलं पाहिजे. तुम्ही स्टारकिड असल्याशिवाय तुम्हाला कोणीही मोठी संधी देणार नाही. सॉरी! पण हेचं सत्य आहे."जेव्हा मुकेश छाबरा यांनी फराह खानला विचारले, "दीपिका पदुकोणसारख्या नवोदितांनाही तुम्ही संधी दिली आहे." तेव्हा फराह म्हणाली, "मी दीपिकाला संधी दिली. कारण- नायकाच्या भूमिकेत शाहरुख खान होता आणि शाहरुखमुळेच मी ती जोखीम पत्करू शकले."दरम्यान, 'ओम शांती ओम' चित्रपटात किरण खेर, श्रेयस तळपदे, अर्जुन रामपाल, युविका चौधरी यांच्याही निर्णायक भूमिका होत्या. 'ओम शांती ओम' चित्रपटानंतर फराह खानने २०१४ रोजी प्रदर्शित झालेल्या 'हॅपी न्यू इयर' चित्रपटात शाहरुख आणि दीपिकाबरोबर पुन्हा काम केले. तर २०२३ रोजी प्रदर्शित झालेल्या पठाण आणि जवान या चित्रपटांमध्ये शाहरुख खान आणि दीपिका पदुकोणने एकत्र काम केले.२००७ रोजी प्रदर्शित झालेला फराह खानचा 'ओम शांती ओम' चित्रपट अजूनही लोकप्रिय आहे. शाहरुख खान अभिनीत या चित्रपटात नायिकेची भूमिका साकारत दीपिका पदुकोणने हिंदी सिनेसृष्टीत पदार्पण केले. कथानक, संवाद व गाण्यांमुळे हा चित्रपट प्रेक्षकांच्या पसंतीस उतरला. त्यावेळी 'ओम शांती ओम'ने बॉक्स ऑफिसवर बक्कळ कमाई केली होती. परंतु, 'मॅशेबल इंडिया'ला दिलेल्या मुलाखतीत 'ओम शांती ओम' चित्रपटात दीपिका पदुकोणला फक्त शाहरुख खानमुळे संधी मिळाल्याचे दिग्दर्शिका फराह खानने सांगितले. कास्टिंग दिग्दर्शक मुकेश छाबरा यांच्याशी संवाद साधताना फराह म्हणाली.

# दबाव नसतानाही लग्न करण्याचं कारण?

फॅशन आयकॉन मलायका अरोरा सोशल मीडियावर खूप चर्चेत असते. अवघ्या विशीत ती अभिनेता अरबाज खानला भेटली आणि त्याच्या प्रेमात पडली. मग दोघांनी लग्न केलं पण लग्नाच्या १९ वर्षांनंतर दोघे विभक्त झाले. आता एका मुलाखतीत मलायकाने घटस्फोटाचा निर्णय कसा घेतला याबद्दल सांगितलं आहे. इतकंच नाही तर पोटगीचा उल्लेख करत लोकांनी किती वाईट कमेंट्स केल्या, तो प्रसंगही सांगितला. 'पिंकविला'ला दिलेल्या एका मुलाखतीत, मलायकाने तिच्या कुटुंबाकडून कोणताही दबाव नसतानाही २५ व्या वर्षी लग्न करण्यामागचं कारण सांगितलं. "मी अशा कुटुंबात वाढले नव्हते, जिथे 'अरे तुला या वयात लग्न करावं लागेल' असं म्हटलं गेलं. मला हवं तसं आयुष्य जगण्यास सांगितलं होतं. बाहेर जा, जीवनाचा आनंद घे, नवनवीन लोकांना भेट आणि रिलेशनशिपमध्ये राहा, असं सांगण्यात आलं होतं. इतकी मोकळीक असूनही माझ्या डोक्यात काय विचार आले ते मला माहित नाही, मी २२-२३ वर्षांचे असताना म्हणाले की मला लग्न करायचं आहे. माझ्यावर कोणीही लग्नासाठी दबाव आणला नाही पण मला तेच करायचं होतं, कारण त्या क्षणी माझ्याकडे हा सर्वोत्तम पर्याय होता," असं मलायका म्हणाली.मलायकाने कबूल केलं की लग्न झाल्यानंतर अनेक वर्षांनी तिला हे समजलं की तिला आयुष्यात हेच हवं नव्हतं. "जेव्हा मी घटस्फोट घेण्याचा निर्णय घेतला, तेव्हा मला वाटत नाही की इंडस्ट्रीमध्ये खूप महिला घटस्फोट घेत होत्या आणि आयुष्यात पुढे जात होत्या. मला माझ्यासाठी, माझ्या वैयक्तिक वाढीसाठी, मला माझ्या मुलाला आनंदी ठेवण्यासाठी, मुलाने आयुष्यात काहीतरी करावं यासाठी घटस्फोट हा योग्य पर्याय वाटला, तर मी तेच केलं," असं मलायका म्हणाली.घटस्फोटाकडे लोक तुच्छतेने पाहतात, असंही तिने नमूद केलं. "घटस्फोटानंतर माझ्या आजूबाजूच्या कोणालाही आनंदी करण्यासाठी मी स्थिर आणि आनंदी वाटणं गरजेचं होतं, कारण त्याची सुरुवात माझ्यापासून होते आणि मी तेच केलं," असं मलायकाने नमूद केलं. मलायका सोशल मीडियावर खूप लोकप्रिय आहे. मलायकाने सांगितलं की एकदा तिने परिधान केलेल्या एका ड्रेसची किंमत असलेली बातमी छापून आली होती, त्यावर खूप वाईट कमेंट्स होत्या. 'इतका महाग ड्रेस मलायकाला परवडू शकतो कारण तिला पोटगीत खूप पैसे मिळाले आहेत,' अशी एक कमेंट होती. ती पाहून मला धक्का बसला. या कमेंट्स पाहून मला इतकंच वाटलं की तुम्ही आयुष्यात कोणत्याही स्तरावर काहीही केले तरी त्याचा काही फरक पडत नाही, असं ती म्हणाली.फॅशन आयकॉन मलायका अरोरा सोशल मीडियावर खूप चर्चेत असते. अवघ्या विशीत ती अभिनेता अरबाज खानला भेटली आणि त्याच्या प्रेमात पडली. मग दोघांनी लग्न केलं पण लग्नाच्या १९ वर्षांनंतर दोघे विभक्त झाले.



# रशीद खानच्या शिलेदारांचं कौतुक!

## अफगाणिस्तान क्रिकेट बोर्डाने शेअर केला व्हिडीओ

नवी दिल्ली ।
। वृत्तसंस्था

**टी-२० विश्वचषक स्पर्धेतील सुपर ८ च्या सामन्यात अफगाणिस्तानने बांगलादेशचा पराभव करत उपांत्य फेरीत प्रवेश केला आहे. अफगाणिस्तानच्या संघाने प्रथमच ही ऐतिहासिक कामगिरी केली आहे. त्यांच्या या विजयानंतर आता क्रिकेट विश्वातून त्यांचे कौतुक केलं जातं आहे. दरम्यान, अफगाणिस्तानच्या या कामगिरीनंतर आता तालिबान सरकारनेही त्यांचं कौतुक केलं आहे**



तालिबान सरकारमधील परराष्ट्र मंत्री अमीर खान मुत्ताकी यांनी अफगाणिस्तान संघाचा कर्णधार रशीद खानबरोबर व्हिडीओ कॉलद्वारे संवाद साधला आहे. अफगाणिस्तान क्रिकेट बोर्डाने यासंभाषणाचा व्हिडीओ शेअर केला आहे. हे संपूर्ण संभाषण पश्तो भाषेत असून या व्हिडीओत अमीर खान मुत्ताकी यांनी बांगलादेशविरुद्धच्या सामान्यात मिळवलेल्या विजयाबद्दल रशीद खानच्या शिलेदारांचं अभिनंदन केलं आहे. तसेच त्यांनी उपांत्य फेरीतील समान्यासाठी अफगाणिस्तान संघाला शुभेच्छादेखील दिल्या आहेत.महत्त्वाचे म्हणजे रशीद खान यानेही या शुभेच्छा स्वीकारत उपांत्य फेरीतील सामन्यात विजय मिळवू असा विश्वास व्यक्त केला आहे. उपांत्य फेरीत अफगाणिस्तान सामना बलाढ्य दक्षिण आफ्रिकाबरोबर होणार आहे. हा सामना २७ जून रोजी खेळवला जाणार असून जो संघ जिंकेल तो थेट अंतिम फेरीत दाखल होणार आहे.दरम्यान, आज बांगलादेश विरुद्ध झालेल्या सामान्यात अफगाणिस्तानच्या संघाने शानदार कामागिरी करत विजय मिळवला आहे. त्यांच्या विजयाने ऑस्ट्रेलियाचं या स्पर्धेतील आव्हान संपुष्टात आलं आहे. या सामान्यात अफगाणिस्तानने पुन्हा एकदा आपल्या भेदक गोलंदाजीचे प्रदर्शन केले असून नवीन उल हकने १८व्या षटकात सलग दोन विकेट्स घेत बांगलादेशला ऑल आऊट केलं. तर अफगाणिस्तानाने प्रथम फलंदाजी करताना ५ बाद ११५ धावा केल्या. महत्त्वाचे म्हणजे सततच्या पावसाने या सामन्यात मोठा व्यत्यय आणला. अखेरीस या सामन्याचे एक षटकही कमी केले. मात्र, ११.४ षटकांनंतर पुन्हा पाऊस सुरू झाल्याने डीएलएसनुसार अफगाणिस्तानच्या संघाला विजय घोषित करण्यात आले. अफगाणिस्तानच्या संघाने आपल्या झुंजार खेळीच्या जोरावर सेमीफायनलमध्ये धडक मारली. यंदाच्या टी-२० विश्वचषकातील अफगाणिस्तानची कामगिरी वनडे वर्ल्डकपपेक्षा एक पाऊल पुढे होती. अफगाणिस्तातनने गतवर्षी भारतात झालेल्या वर्ल्डकपमध्येही आपल्या खेळीची छाप सोडत आपल्या नावाचा दबदबा निर्माण करण्यास सुरूवात केली अन् यंदाच्या विश्वचषकात तर न्यूझीलंड आणि ऑस्ट्रेलियासारख्या बलाढ्य देशांना पराभवाचे पाणी पाजत आंतरराष्ट्रीय क्रिकेटमधील भारतानंतर सर्वोत्कृष्ट आशियाई संघ म्हणून आपली ओळख निर्माण करत आहे. मोहम्मद नबी हा अफगाणिस्तान क्रिकेटमधील स्थित्यंतर याचि देही याचि डोळा पाहणारा खेळाडू. मोहम्मद नबी हा ३९ वर्षांचा आहे, पण त्याची कामगिरी आणि त्याचा फिटनेस अजूनही तितकाच कमालीचा आहे. अफगाणिस्तानच्या संघाकडून सर्वाधिक ४५ देशांविरूद्ध विजय मिळवलेला मोहम्मद नबी हा एकमेव खेळाडू आहे. जागतिक क्रिकेटच्या इतिहासात कोणत्याही खेळाडूने एका संघाकडून इतक्या देशांविरूद्ध सामने जिंकलेले नाहीत. नबीने २००९ साली अफगाणिस्तानकडून आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये पदार्पण केले. तर २००८ मध्ये अफगाणिस्तानच्या संघाला वर्ल्ड क्रिकेट लीगच्या डिव्हिजन 5साठी पात्रता मिळाली होती.

### भारतात सराव सामने खेळतो

२०१३ मध्ये अफगाणिस्तानचा अफिलिएट दर्जा बदलून त्यांना असोसिएट दर्जा देण्यात आला. कसोटी खेळणारे दहा संघ, असोसिएट आणि ॲफिलिएट अशी आयसीसीची संघांची रचना आहे. यानंतर सातत्यपूर्ण प्रदर्शन असणाऱ्या अफगाणिस्तानला आयसीसीने २२ जून २०१७ रोजी कसोटी खेळण्याचा दर्जा बहाल केला. २०१८ मध्ये १४ ते १८ जून या कालावधीत बेंगळुरू इथे भारताविरुद्ध अफगाणिस्तानने कसोटी पदार्पण केलं. सुरक्षिततेच्या कारणास्तव अफगाणिस्तानचे सामने त्यांच्या देशात होत नाहीत. सुरुवातीला अफगाणिस्तानने युएई तसंच श्रीलंकेतील दंबुला इथे सामने खेळले. त्यानंतर बीसीसीआयने त्यांना मदतीचा हात दिला. यानंतर गेली अनेक वर्षे अफगाणिस्तानचा संघ भारतात सराव सामने खेळत मालिकाही खेळतो.

# अफगाणिस्तानचा संघ सेमीफायनलमध्ये धडकला

## रशीदचं रौद्र रूप, धाव घेण्याचं नाकारताच बॅट फेकून मारली

।नवी दिल्ली ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**अफगाणिस्तान संघाने बांगलादेशवर ८ धावांनी विजय मिळवत टी-२० विश्वचषकामध्ये इतिहास रचला आहे. यंदाच्या वर्ल्डकपम सेमी फायनलमध्ये धडक मारत ऑस्ट्रेलियाला त्यांनी स्पर्धेबाहेर केले आहे. अफगाणिस्तानच्या गोलंदाजांनी पुन्हा एकदा संघाला रोमहर्षक विजय मिळवून दिला आहे. यांनी प्रत्येकी ४ विकेट्स घेतल्या आणि संघाच्या विजयात मोलाची भूमिका बजावली. पण अफगाणिस्तानचा संघ फलंदाजीत चांगलाच मागे पडला पण रशीदच्या अखेरच्या षटकातील धावा संघासाठी महत्त्वपूर्ण ठरल्या.**



संघासाठी धावा करताना रशीद धावा मिळवण्याचा प्रचंड आटापिटा करत होता. यादरम्यान मैदानात धाव नाकारल्याने रशीदने समोरच्या फलंदाजावर बॅट फेकली, ज्याचा व्हीडिओ चांगलाच व्हायरल होत आहे. बांगलादेशविरुद्ध अफगाणिस्तानचे २० वे षटक सुरू होते. संघ ५ विकेट्सवर १०७ धावांवर झुंजत होता. रशीद खान क्रीजवर उपस्थित होता, त्याला समजले की या धावा बांगलादेशसाठी कमी असू शकतात आणि प्रत्येक चेंडूवर शक्य होतील तितक्या धावा घेण्याचा प्रयत्न करत होता पण करीमने अर्धी क्रिज धावत आलेल्या रशीदला धाव नाकारली आणि तो चांगलाच भडकला.तंजीम हसन साकिबच्या पहिल्या चेंडूवर करीम जनातने रशीद खानला स्ट्राईक दिली. आक्रमक फलंदाजी शैलीसाठी प्रसिद्ध असलेल्या रशीदने दुसऱ्या चेंडूवर षटकार ठोकला. तिसऱ्या चेंडूवर त्याने मोठा फटका मारण्याचा प्रयत्न केला, पण चेंडू मिस हिट झाला आणि मिड-विकेटच्या सीमारेषेकडे जाण्याऐवजी कव्हर्समध्ये गेला. दरम्यान, रशीदने एक धाव घेतली आणि तो दुसरी धाव घेण्यासाठी धावला, परंतु जनातने त्याला माघारी पाठवले.

### रशीदला धाव नाकारली

संतप्त झालेल्या रशीद खानने मागे धावताना आपली बॅट जमिनीवर फेकली. तो करीमवर नाराजी व्यक्त करताना दिसला आणि पुन्हा माघारी परतला.संघासाठी धावा करताना रशीद धावा मिळवण्याचा प्रचंड आटापिटा करत होता. यादरम्यान मैदानात धाव नाकारल्याने रशीदने समोरच्या फलंदाजावर बॅट फेकली, ज्याचा व्हीडिओ चांगलाच व्हायरल होत आहे. बांगलादेशविरुद्ध अफगाणिस्तानचे २० वे षटक सुरू होते. संघ ५ विकेट्सवर १०७ धावांवर झुंजत होता. रशीद खान क्रीजवर उपस्थित होता, त्याला समजले की या धावा बांगलादेशसाठी कमी असू शकतात आणि प्रत्येक चेंडूवर शक्य होतील तितक्या धावा घेण्याचा प्रयत्न करत होता पण करीमने अर्धी क्रिज धावत आलेल्या रशीदला धाव नाकारली आणि तो चांगलाच भडकला.